**महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडल**
राज्य जैवविविधता मंडळाच्या अध्यक्ष
पदासाठी नेमणूक करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
क्रमांक :- डब्ल्यूएलपी-२००९/ प्र.क्र.१५/फ-१
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- 5 JUL 2011

**प्रस्तावना :-**

जैवविविधता अधिनियम २००२ च्या कलम ६३ (१) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ तयार करण्यात आले असून सदर नियम महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदर नियमातील तरतुदीनुसार राज्य जैवविविधता मंडळाची स्थापना करावयाची असून सदर मंडळाच्या अध्यक्षपदी, जैविक विविधतेचे संवर्धन व ती निरंतर राहील अशा प्रकारे तिचा वापर आणि लाभांच्या समन्यायी वाटपासंबंधीच्या बाबी, या क्षेत्रातील तज्ञ व प्रदीर्घ अनुभवी आणि शासकीय अधिकारी नसलेल्या पात्र व्यक्तीची निवड करणे आवश्यक आहे. तसेच सदर नियमातील नियम ३(२) व ३ (३) मधील तरतुदीनुसार मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय शोध समितीच्या शिफारसीनुसार मंडळाच्या अध्यक्षाची नियुक्ती राज्य शासनाद्वारे करावयाची आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र जैविक विविधता नियम २००८ मधील नियम ३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे अध्यक्षपदासाठी डॉ.एरिक भरुचा यांची नियुक्ती करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे मुख्यालय नागपूर हे राहील. तसेच जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष यांच्या मानधनाबाबतचा शासन निर्णय वेगळयाने निर्गमित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(प्रविण परदेशी)**
प्रधान सचिव (वने)
महसूल व वन विभाग

**प्रति :**

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

**प्रत :**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
३. वित विभाग, (व्यय-१०) मंत्रालय, मुंबई- ३२.
४.निवड नस्ती, फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई ३२.